# प्रेस नोट

दि २२/१०/२०१७ रोजी दुपारी ०३.३० वा चे सुमारास इसम नामे शेखर लक्ष्मण पाचवे उर्फ शेखर दशरथ कंधारे, वय २५ वर्षे, रा. मु. पो चिंचवड ता. मुळशी जि. पुणे  यास आरोपी (१) सौरभ विलास कंधारे, वय २३ वर्षे, रा. फलॅट नं. ३०३, विघ्नहर्ता सोसायटी, एरंडवणे, गावठाण, म्हात्रे ब्रिजजवळ, एरंडवणे, पुणे (२) प्रमोद दगडू वाघ, वय २३ वर्षे, रा. फलॅट नं. १, मथाई एनेक्स, एरंडवणा पुणे यांनी त्यांचे आणखीन दोन साथीदाराचे मदतीने आरोपी सौरभ कंधारे याच्या बहीण हिच्यासोबत जबरदस्ती प्रेमसंबध ठेवत असल्याने आरोपीनी पिडीत शेखर लक्ष्मण पाचवे यास एकलव्य कॉलेजजवळ निर्जन ठिकाणी बोलावुन त्यास मारहाण करुन त्यास मारुती कारमध्ये घालुन आरोपीनी त्यास कर्जत तालुक्यातील बिटकेवाडी गावाचे पुढे दोन किमी अंतरावर निर्जन ठिकाणी कोयत्याने मारहाण करुन त्याचा खुन करुन खुन केल्यानंतर त्याचे अंगावर पेट्रोल टाकुन जाळुन पुरावा नष्ट करण्याचा प्रयत्न केला आहे

सदरची घटना हि दि २२/१०/२०१७ रोजी एकलव्य कॉलेजजवळ घडली त्यावेळी मयताचा मित्र नामे सिध्दार्थ नथुराम कदम याने पाहीली होती. मयतास एक भाऊ असुन आई वडील नाही. त्याबाबतची माहीती सिध्दार्थ नथुराम कदम याने दि २३/१०/२०१७ रोजी कोथरुड पो स्टे याठिकाणी दुपारी येवुन कळविली त्यावरुन पोलीसांनी मयताचा भाऊ बसवराज लक्ष्मण पाचवे रा मु पो चिंचवड ता मुळशी जि पुणे याचा शोध घेवुन त्याच्याकडे व सिध्दार्थ कदम याच्याकडे चौकशी केली असता बसवराज पाचवे यांनी दि २३/१०/२०१७ रोजी कोथरुड पो स्टे येथे सौरभ कंधारे व प्रमोद वाघ व त्यांचे दोन साथीदार यांच्याविरुध्द त्याच्या भावास पळवुन नेलेबाबत फिर्याद दिल्याने कोथरुड पो स्टे याठिकाणी गुन्हा दाखल करण्यात आला.

सदर प्रकाराबाबत गुन्हा दाखल झाल्यानंतर सदर गुन्हयाचा तपास वरीष्ठ पोलीस निरीक्षक श्री रघुनाथ फुगे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक जोगदंड, हे करीत असताना पो हवा भालचंद्र निंबाळकर यांना मिळालेल्या बातमीनुसार आरोपी सौरभ कंधारे व प्रमोद वाघ हे कृष्णसुंदर गार्डन म्हात्रे पुलाजवळ नदीकिनारी येणार असल्याची बातमी मिळाल्याने पोउनि जोगदंड, पोहवा निंबाळकर, पोहवा रणवरे, पोहवा शिंदे, पोना कुदळे यांनी सदर ठिकाणी जावुन मिळालेल्या माहीती प्रमाणे ट्रप लावला असता दोन्ही आरोपी मिळुन आले. त्यांना प्रथम कोथरुड पो स्टे येथे तपासकामी आणले असता सुरवातीस त्यांनी माहीती देण्यास टाळाटाळ केली परंतु त्यांच्याकडे कसुन तपास

केल्यानंतर आरोपीनी मयत शेखर लक्ष्मण पाचवे याचे लग्न झालेले असतानासुध्दा तो सौरभ कंधारे याची बहीण हिला लग्न कर म्हणुन नेहमी त्रास देत होता त्यास समजावुन सांगुन सुध्दा बहीणीसोबत प्रेम संबध प्रस्थापित करण्याचा प्रयत्न करीत होता, म्हणुन आरोपीनी मयतास एकलव्य कॉलेज याठिकाणाहुन मारुती कारमध्ये घालुन मारहाण करुन त्यास कर्जत तालुक्यातील बिटकेवाडी गावाचे पुढे दोन किमी अंतरावर निर्जन ठिकाणी कोयत्याने मारहाण करुन त्याचा खुन केला असल्याची कबुली दिली. आरोपीनी दिलेल्या कबुलीप्रमाणे एक पोलीस पथक आरोपीचे सांगणेप्रमाणे कर्जत, श्रीगोंदा तालुक्यात पाठविले असता मयत शेखर लक्ष्मण पाचवे याची बॉडी कोयत्याने वार करुन जखमी अवस्थेत तसेच त्याच्या अंगावर पेट्रोल टाकुन जाळलेल्या अवस्थेत मिळुन आलेली आहे. सदर गुन्हयाचा तपास मा. अपर पोलीस आयुक्त दक्षिण प्रादेशिक विभाग श्री. रविंद्र सेनगांवकर सो, मा. पोलीस उपआयुक्त श्री मुंढे सो, सहा.पोलीस आयुक्त डेक्कन विभाग श्री नाईक सो यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री रघुनाथ फुगे, पोउनि जोगदंड, पोउनि जाखडे, पोहवा निंबाळकर, पोहवा रणवरे, पोहवा शिंदे, पोना कुदळे, यांनी करुन सदरचा गुन्हा तात्काळ उघडकीस आणुन आरोपीना अटक केली आहे.